**दि.मु.क.१५२/२००८**
नि.क्र. १०० खाली

**<u>शपथेवर पुढील सरतपास वादीतर्फे ॲड. श्री.खोंदले</u>**

१. न्यायालयात दाखल केलेल्या शपथपत्रातील मजकूर खरा व बरोबर असून त्यावर माझी सही आहे. मी दावा मिळकतीचे मुळ नकाशे दाखल केले आहेत. सदरील नकाशांना नि.क्र. १०६ ते १०९ देण्यात येते. मी दावा मिळकतीचे सातबारा उतारे व नमुना ८-अ उतारे दाखल केले. सातबारा उता-यांना नि.क्र. ११० व १११ देण्यात आला व नमुना ८-अ ला नि.क्र. ११२ व ११३ देण्यात आले. तसेच या दावा मिळकतींचा अधिकार अभिलेख दाखल केला आहे. त्यास नि.क्र. ११४ देण्यात आला. तसेच मी माझे पतीच्या मृत्यूच्या दाखल्याची मुळ प्रत दाखल केली आहे. त्यास नि.क्र. ११५ देण्यात आला. तसेच माझी सासुबाईचा मृत्यूचा दाखला दाखल केला आहे. त्यास नि.क्र. ११६ देण्यात आला. तसेच मी माझे मुलीच्या जन्माचा दाखला देखील या प्रकरणात जोडला आहे. त्यास नि.क्र. ११७ देण्यात आला. मी माझ्या सासुबाईंना व सास-यांना पाठविलेल्या कायदेशिर नोटीसीची प्रत या प्रकरणात दाखल केली आहे. त्यातील मजकूर मला मान्य आहे. त्यावर माझी सही नाही. सदरील नोटीसला ओळखीपुरता नि.क्र. ११८ देण्यात आला. तसेच ही नोटीस माझे सासू सास-यांना पोच झाल्याबाबतची पोस्टाची पोच पावती मी दाखल केली आहे. त्यास नि.क्र. ११९ व १२० देण्यात आला. तसेच मी पाठविलेल्या नोटीसला आलेल्या उत्तराची मुळप्रत या प्रकरणात दाखल केली आहे. त्यास नि.क्र.१२१ देण्यात आला. तसेच दावा प्रलंबित असतांना प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी दावा मिळकत प्रतिवादी क्र.९ ला विकली असल्याबाबतचे विक्रीपत्राची साक्षांकित प्रत मी दाखल केली आहे. त्यास नि.क्र. १२२ देण्यात आला. मी माझे मुलीच्या शाळा सोडण्याच्या दाखल्याचे झेरॉक्स प्रत दाखल केली. त्यास नि.क्र. १२३ देण्यात आला.

दि.मु.क.१५२/२००८
नि.क्र. १०० खाली

साक्षीदाराचा उलटतपास मंगळवार दिनांक ११.७.२०१७ पर्यंत तहकुब

माझे समक्ष, सा.ब.वा.दा.क.केले.

दि.न्या.क.स्तर,कळमेश्वर. सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,कळमेश्वर.

**दिनांक : ०७.०७.२०१७**

**दिनांक : २५.७.२०१७**

**शपथेवर उलटतपास प्रतिवादी क. १-अ तर्फे ॲड. श्री. मुळे**

(साक्षीदाराच्या उलटतपासावेळी तिची मुलगी श्रीमती कांचन लेखराज चौधरी ही कोर्टामिध्ये हजर व हा उलटतपास तिचे हजेरीमध्ये नोंदविण्यात आला.)

०२ संतोषराव ढवंगळे हे माझे आजे सासरे आहेत. माझे आजे सास-यांना चार मुली व दोन मुली आहेत. मुलांची नांवे शेषराव, दिगांबर, काशीराम, दादाराव अशी आहेत. शेषराव हे मयत आहेत. त्यांच्या पश्चात त्यांना दोन मुले अरूण व सुधाकर व दोन मुली लता व कुसुम या आहेत. सुधाकर हा प्रस्तूत दावा प्रलंबित असतांना मयत झाला. सुधाकर यांना त्यांच्या पश्चात रोशन व राहत नामक मुले आहेत. दादाराव हे मयत असून त्यास कुंभराज व निखिल ही मुले असून मंगला व वनिता हया त्यांच्या मुली आहेत. काशीराम हा मयत असून त्यास चंद्रशेखर नावाचा मुलगा व वनिता नावाची मुलगी आहे. तसेच काशीरामची पत्नी रूखमाबाई हया तिच्या पतीच्या पश्चात त्यांच्या वारस म्हणून हयात आहेत. तसेच दादारावची पत्नी कमलाबाई ही देखील जिवंत आहे.

०३ परसोडी वकील या गांवी देवकाबाई ढवंगळे यांचे नांवे तीन मिळकती आहेत. मला या मिळकतीचे नंबर माहित नाही. देवकाबाईने ही जमीन कशी विकत घेतली हे मला माहित आहे. हे म्हणणे खरे आहे की, १९७८ व १९८० सालच्या खरेदी खताअन्वये या जमीनी विकत घेतल्या गेल्या होत्या. हे म्हणणे खोटे आहे की, परसोडी वकील या गावातील जमीनीमध्ये माझा कोणताही अधिकार नाही. हे म्हणणे खोटे आहे की, माझे पती धनराज हे मयत झाल्यावर मी स्वत:हून माझे माहेरी निघून गेले. हे म्हणणे खरे नाही की, खोटी साक्ष देत आहे व माझा दावा मिळकतीमध्ये कोणताही हक्क व अधिकार नाही. हे म्हणणे खोटे आहे की, देवकाबाई हिस परसोडी वकील गावामधील जमीनी तिच्या वडीलांनी घेवून दिल्या होत्या.

**उलटतपास प्रतिवादी क्र. ९ तर्फे ॲड. श्री. ताजणे**

०४ माझे लग्न १९८७ रोजी झाले. लग्न झाल्यावर मी परसोडी वकील या गावी नांदावयास आले. परसोडी हे गांव माझे मामे सास-यांचे आहे. ढवंगळे यांचे मुळ गांव तेलगांव आहे. माझे सासरे परसोडी या गावात केव्हा राहावयास आले हे मला माहित नाही. माझे सासूबाईने परसोडी येथील जमीन कुणाकडून विकत घेतली हे मला माहित नाही. तसेच या व्यवहाराबद्दल सुध्दा मला माहित नाही. मी अधूनमधून तेलगांवला जाते. तेलगांवला एक घर असून शेती देखील आहे. ते शेत मी पाहिले आहे. त्या शेतामध्ये प-हाटी व तुरीचे पीक असते. तेलगांवची जमीन विकतेवेळी जमीन विकणारे लोक हे मला माझे हिस्स्यातील जमीनीपोटी रूपये तीन लाख देवू केले होते पण, मी ते पैसे घेतले नाही. माझे पती नोकरीला असल्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा मी दाखल केला नाही पण, ते शेती करीत होते. हे म्हणणे खरे आहे की, माझे

**दि.मु.क.१५२/२००८**
नि.क्र. १०० खाली

लग्नाअगोदरच परसोडी येथील जमीन विकत घेतली होती व घर देखील होते. मी पैशाच्या देवाणघेवाणीबाबत कोणताच कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही. हे म्हणणे खोटी आहे की, परसोडी येथील जमीन देवकाबाईच्या वडीलांनी घेवून दिली होती. हे म्हणणे खोटे आहे की, तेलगांव येथील जमीनीत काहीच उत्पन्न येत नाही. हे म्हणणे खोटे आहे की, तेलगांव येथील जमीन काही उत्पन्न येत नसल्याकारणाने देवकाबाईचे वडीलांनी तिस परसोडी येथे जमीन घेवून दिली. हे म्हणणे खरे नाही की, मी माझे सरतपासात खोटी साक्ष देत आहे.
फेरतपासणी - काही नाही.

माझे समक्ष, सा.ब.वा.दा.क.केले.

दि.न्या.क.स्तर,कळमेश्वर. सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,कळमेश्वर.

**दिनांक : २५.०७.२०१७**